# के. के. वाघ कॉलेजमध्ये मार्गदर्शन शिबिर



**पंचवटी:** सातत्यापूर्ण वाचन, प्रभावी विचारांचे श्रवण आणि उत्तम निरीक्षणातून अभ्यासू वृत्तीने यशस्वी सूत्रसंचालक घडतो, असे प्रतिपादन कवी व सूत्रसंचालक रवींद्र मालुंजकर यांनी केले. के. के. वाघ कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात सूत्रसंचालन – एक कौशल्य या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. दिंडोरी तालुक्यातील आशेवाडी येथे झालेल्या या व्याख्यानप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक प्रा. नानासाहेब गुरुळे, कार्यक्रम अधिकारी प्रा. छाया माळवे, प्रा. मयूर उशीर आदी उपस्थित होते.

**दै. महाराष्ट्र टाइम्स, दि. २८-१२-२०१७**

# शाश्वत व्यावसायिकतेसाठी ठेवा वैश्विक दृष्टिकोन : पवार

## के. के. वाघमध्ये साधला संवाद; तरुणाईला यशस्वितेचा कानमंत्र

सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. १९ : इस्त्राईलची लोकसंख्या काही लाखांत आहे. पण जगभरात इस्त्राईलमार्फत उत्पादनांची निर्यात केली जाते. भारताचा विचार केल्यास ऑटोमोबाईलसह विविध यंत्रांच्या सुट्या भागांची बाजारपेठ सहा लाख कोटींची आहे. उद्योजकतेची संधी स्वीकारत सुट्या भागांचे उत्पादन करून तरुण चांगली कमाई करू शकतात, असे प्रतिपादन 'सकाळ' माध्यम समूहाचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांनी आज येथे केले. तसेच शाश्वत व्यवसायात तरुणांनी वैश्विक दृष्टिकोन ठेवावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

के. के. वाघ शिक्षण संस्थेतील प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांशी श्री. पवार यांनी संवाद साधला. संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त चांगदेवराव होळकर, समीर वाघ, सचिव डॉ. के. एस. बंदी, चांदोरी महाविद्यालयातील समिती, सदस्य सुरेश भोज, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एस. नांदूरकर, उच्च शिक्षण समन्वयक डॉ. बी. जी. वाघ, संगणक विभागाचे प्रमुख डॉ. एस. एस. साने आदी उपस्थित होते.

श्री. पवार म्हणाले, की तरुण पिढीमध्ये बौद्धिक, शारीरिक क्षमता आहेत. शिवाय भारतीय बाजारपेठेत व्यवसायाच्या संधीही उपलब्ध आहेत. या संधी स्वीकारत व्यवसाय मिळविला नाही तर दुसऱ्या कुणाच्या तरी वाट्याला ही संधी जाईल, याची जाणीव ठेवावी. आपल्यातील संपूर्ण ऊर्जेचा वापर ध्येयप्राप्तीसाठी करतो आहोत की नाही, याचा विचार तरुणांनी करावा. भविष्याचा वेध घेताना होणारे बदल आत्मसात करत व्यवसायातही परिवर्तन आणावे. अडचणींचा बागूलबुवा न करता, आपल्यातील संपूर्ण ऊर्जेचा वापर केल्यास यश निश्चित मिळेल.

संवादावेळी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना श्री. पवार यांनी उत्तरे दिली. डॉ. नांदूरकर यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या विस्ताराची माहिती दिली. तसेच विद्यार्थिहितासाठी राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. प्रा. डॉ. प्राजक्ता विसपुते यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अनघा कानव यांनी परिचय करून दिला. प्राचार्य डॉ. व्ही. एम. शेवलीकर यांनी आभार मानले.

### शैक्षणिक सुविधांचे कौतुक

**संवादापूर्वी श्री. पवार यांनी अभियांत्रिकी महाविद्यालयातील ग्रंथालय, संगणक कक्ष, प्लेसमेंट विभागाला भेट दिली. विद्यार्थ्यांना महाविद्यालयातर्फे दिल्या जाणाऱ्या सुविधांचे त्यांनी कौतुक केले, तसेच भविष्यात विद्यार्थ्यांच्या हितासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.**



नाशिक : के. के. वाघ शिक्षण संस्थेमधील प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांशी मंगळवारी संवाद साधताना 'सकाळ' माध्यम समूहाचे अध्यक्ष प्रतापराव पवार. शेजारी संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त चांगदेवराव होळकर, समीर वाघ, सचिव के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एस. नांदुरकर आदी.

**दै. सकाळ, दि. २०-१२-२०१७**

परिश्रम घेतले.

## नाशिक के. के. वाघ अभियांत्रिकीत सिमेन्सतर्फे प्रशिक्षण कार्यशाळा

येथील क. का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इटीसी विभागात सिमेन्स कंपनीतर्फे विविध अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापकांसाठी विद्यार्थ्यांची रोजगार कार्यक्षमता सुधारणेबाबत व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सिमेन्स ट्रेनिंग विभागाचे अध्यक्ष सचिन भानुशाली, मधुकर डुबे, मोहम्मद दानिश खान उपस्थित होते. विभागप्रमुख डॉ. दि. म. चांदवडकर यांनी स्वागत केले. सचिन भानुशाली यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता सुधारण्याच्या गरजेवर तसेच विद्यार्थी आणि कंपनी संवादाबाबत चर्चा केली. मधुकर डुबे यांनी विद्यार्थी व शिक्षक यांच्यासाठी सिमेन्स ट्रेनिंग इंडियाच्या अंतर्गत सर्व अभ्यासक्रमाची माहिती दिली. मोहम्मद दानिश खान यांनी पीएलसी व मोटर ड्राईव्हवरील प्रात्यक्षिक दाखविले. प्रा. केतकी कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

**दै. दिव्य मराठी, दि. २३-१२-२०१७**

# वाघ संस्थेच्या परिषदेला प्रतिसाद

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

येथील के. के. वाघ शिक्षण संस्था आणि एच. आर. इन्फोटेकतर्फे पुणे येथे एचआर कॉन्फरन्सला सुरुवात झाली. कॉन्फरन्सला विविध औद्योगिक कंपन्यांमधून सुमारे ७० एचआर व्यवस्थापकांनी सहभाग घेतला. 'इज परफॉरर्मन्स मॅनेजमेंट किलिंग परफॉर्मन्स' या विषयावर पुण्यातील फोर पॉइंट बाय शेरेटॉन हॉटेलमध्ये या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. एचआर इन्फोटेकचे अध्यक्ष एम. बलीराम यांनी निमंत्रितांचे स्वागत केले. वाघ इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी संस्थेसंदर्भात माहिती दिली. वाघ शिक्षण संस्थेचे विश्वस्त समीर वाघ, प्राचार्य डॉ. नांदूरकर आणि विविध विद्याशाखांचे विभागप्रमुख यांनी एच. आर. व्यवस्थापकांसोबत विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासंदर्भात चर्चा केली. भविष्यात विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकसनासाठी कोणते उपक्रम करणे शक्य आहे, याबाबतही चर्चा केली.

परिषदेतील सत्रांमध्ये वाघ कॉलेजचे माजी विद्यार्थी व एका नामांकित कंपनीचे बिझनेस लीडर दिव्येश देसाई, सीनिअर सेल्स मॅनेजर राहुल नेने, डिलिव्हरी पार्टनर आशुतोष आंबेकर यांनी वाघ कॉलेज कॅम्पस ते कॉर्पोरेट इंडस्ट्रीदरम्यानच्या यशस्वी प्रवासाबद्दल माहिती दिली.

या वेळी आशिष अरोरा यांनी 'इज परफॉर्मन्स मॅनेजमेंट किलिंग परफॉर्मन्स' या विषयावर गटानुसार उपक्रम आयोजित केले होते. 'संघटनेची दृष्टी, संस्कृती आणि धोरणांच्या निश्चितीसाठी संघटनेच्या प्रमुखांचे विशेष योगदान हवे. याशिवाय कर्मचाऱ्यांनी नियोजित ध्येय साध्य करण्यासाठी मेहनतीस कमी पडू नये', असे आवाहनही अरोरा यांनी केले. या उपक्रमाच्या आयोजनासाठी डॉ. प्रमोद शहाबादकर, अश्विन जयसिंघानी यांनी प्रयत्न केले.

**दै. महाराष्ट्र टाइम्स ,**
**दि. १८-१२-२०१७**